| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ९९ वा | मंगळवार, दिनांक ०७ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट प्रकरण २००८

## ३८ दहशतवाद्यांची फाशी कायम, गुजरात हायकोर्टाचा मोठा निर्णय; ७० मिनिटांत झाले होते २१ ब्लास्ट!



**अहमदाबाद/वृत्तसंस्था:** २००८ च्या अहमदाबाद साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी मंगळवारी गुजरात उच्च न्यायालयाने अत्यंत महत्वाचा निर्णय सुनावला. विशेष न्यायालयाच्या आदेशावर शिक्कामोर्तब करत उच्च न्यायालयाने ३८ दहशतवाद्यांची फाशी आणि ११ जणांची जन्मठेप कायम ठेवली आहे. एवढेच नाही तर, या स्फोटांमध्ये मरण पावलेल्या एकूण ५६ जणांच्या नातलगांना प्रत्येकी १० लाख रुपये, तर २०० हून अधिक जखमींना प्रत्येकी १ लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेशही न्यायालयाने यावेळी दिले आहेत. अहमदाबाद येथे २६ जुलै २००८ रोजी, केवळ ७० मिनिटांत एकापाठोपाठ एक असे तब्बल २१ बॉम्बस्फोट झाले होते.

**रुग्णालये, बसेस, सार्वजनिक ठिकाणे आणि बाजारपेठांना करण्यात आलं होतं लक्ष्य –**

हल्लेखोर दहशतवाद्यांनी नरोदा, बापूनगर, सरखेज आणि हटकेश्वर आदी गजबजलेल्या भागांमध्ये हे स्फोट घडवून आणले होते. यासाठी दहशतवाद्यांनी सायकल आणि टिफिन बॉक्सचा वापर केला होता. त्यांनी सायकलवर टिफिन बॉक्समध्ये बॉम्ब पेरून, रुग्णालये, बसेस, सार्वजनिक ठिकाणे आणि बाजारपेठांना लक्ष्य केले होते. सुरुवातीच्या स्फोटांनंतर साधारणपणे ४० मिनिटांच्या अंतराने दोन वेगवेगळ्या रुग्णालयांच्या आवारात स्फोट घडवून आणण्यात आले होते.

या घटनेच्या १४ वर्षांनंतर अर्थात २०२२ मध्ये सत्र न्यायालयाने ३८ दहशतवाद्यांना फाशी आणि ११ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. न्यायालयाने हे प्रकरण 'दुर्मिळातील दुर्मिळ' असल्याचे म्हटले होते. एकाच प्रकरणात एवढ्या मोठ्या संख्येने आरोपींना फाशीची शिक्षा सुनावण्याची ही पहिलीच वेळ होती. या विरोधात दोषींनी उच्च न्यायालयात अपील केले होते, तर राज्य सरकारनेही त्यांच्या फाशीच्या शिक्षेला मंजुरी देण्यासाठी याचिका दाखल केली होती. कायद्यानुसार फाशीच्या शिक्षेसाठी साठी उच्च न्यायालयाची मंजुरी आवश्यक असते.

## जयंत पाटील-विनोद तावडे यांच्यात गुप्त बैठक?



**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या राजकीय घडामोडींच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील आणि भाजपाचे वरिष्ठ नेते विनोद तावडे यांची एका पंचतारांकित हॉटेलमध्ये भेट झाल्याची माहिती आहे. शुक्रवारी झालेल्या या भेटीमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. या भेटीनंतर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीत सहभागी होणार का? अशा चर्चांना वेग आला आहे.

माहितीनुसार, शरद पवारांची राष्ट्रवादी महायुतीत सहभागी झाल्यास पक्षाच्या वाट्याला काय येऊ शकते याबाबत बैठकीत चर्चा झाल्याचे बोलले जाते. जयंत पाटील आणि विनोद तावडे यांच्या भेटीत नेमकी कोणत्या विषयावर चर्चा झाली. याबाबत दोन्ही बाजूंनी अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही परंतु मागील काही दिवसांपासून शरद पवारांची राष्ट्रवादी एनडीएचा घटक पक्ष होऊ शकतो अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. अशावेळी पाटील-तावडे भेट महत्त्वाची मानली जाते. शुक्रवारी दुपारी सव्वा तीन ते सव्वा सहा वाजेपर्यंत या दोन्ही नेत्यांमध्ये भेट झाली. या भेटीत एनडीएतील सहभागावर चर्चा झाल्याची माहिती आहे. एबीपी माझाने सूत्रांच्या हवाल्याने हे वृत्त प्रसारित केले आहे.

विनोद तावडे यांच्या भेटीनंतर जयंत पाटील यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील एका वरिष्ठ नेत्याची भेट घेतली. सध्या अजित पवारांची राष्ट्रवादी महायुतीचा घटक पक्ष आहे. शरद पवारांची राष्ट्रवादी महायुती आल्यास दोन्ही राष्ट्रवादीचं भवितव्य काय असेल यावर या नेत्यांमध्ये चर्चा झाली. या भेटीबाबत माध्यमांच्या प्रतिनिधींनी जयंत पाटील यांच्याकडे विचारणा केली तेव्हा त्यांनी भेट झाल्याचे मान्य केले. परंतु ही भेट अनौपचारिक होती असं त्यांनी म्हटलं. परंतु या भेटीमुळे राज्यातील राजकीय समीकरणे बदलणार या चर्चांनी जोर धरला आहे.

## स्कूल बस उलटली, २८ विद्यार्थी बालंबाल बचावले



**रेणापूर/बाळू स्वामी:** समोरून येणाऱ्या एका वाहनाला साईड देताना रस्त्याच्या बाजूला असलेल्या मातीवरुन स्कूलबस घसरली आणि चालकाचे नियंत्रण सुटल्याने ती थेट रस्त्यालगतच्या खड्ड्यात उलटली. या अपघातात सुदैवाने २८ विद्यार्थी बालंबाल बचावले असून चार विद्यार्थी किरकोळ जखमी झाले आहेत. तसेच बसचे मोठे नुकसान झाले. ही घटना खानापूर पाटी (ता. रेणापूर) येथे सोमवारी सकाळी ८.३० वा. च्या सुमारास घडली.

रेणापूर तालुक्यातील पोहरेगाव येथील जनता विद्यालयात डिगोळ तांडा, ईटी आणि खानापूर येथील इयत्ता पाचवी ते नववीचे विद्यार्थी शिक्षणासाठी स्कूल बसने दररोज ये- जा करीत असतात. सोमवारी सकाळी २८ विद्यार्थ्यांना घेऊन स्कूलबस (एमएच २४, बीडब्ल्यू २५६९) खानापूरहून पोहरेगावच्या दिशेने जात होती. तेव्हा खानापूर पाटीजवळ समोरून येणाऱ्या एका वाहनाला साईड देताना, रस्त्याच्या कडेला असलेल्या मातीवरून बस घसरली. तेव्हा चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस थेट रस्त्यालगतच्या खड्ड्यात उलटली. या अपघातात १० ते १५ विद्यार्थ्यांना खरचटले. त्यातील चौघांना थोडासा अधिक मार लागल्याने फ्रॅक्चर झाल्याचा संशय व्यक्त करीत डॉक्टरांनी लातूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पाठविले.

**नागरिक, शिक्षकांनी घेतली तात्काळ धाव...**

या अपघाताची माहिती मिळताच पोहरेगाव व खानापुरातील नागरिक तसेच जनता विद्यालयाच्या शिक्षकांनी आणि परिसरातील नागरिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी बसमधील विद्यार्थ्यांना आणि कर्मचाऱ्यांना सुखरूप बाहेर काढले. जखमी व घाबरलेल्या विद्यार्थ्यांना तातडीने रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

**अपघातामुळे विद्यार्थ्यांमध्ये घबराट**

अपघातात १० ते १५ विद्यार्थ्यांना किरकोळ खरचटले असून काही विद्यार्थी प्रचंड घाबरले होते. त्यांच्यावर रेणापूर ग्रामीण रुग्णालयात प्रथमोपचार करण्यात आले. किरकोळ मार लागलेल्या चार विद्यार्थ्यांना 'फ्रॅक्चर' असण्याच्या संशयावरून पुढील तपासणीसाठी लातूरच्या विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पाठविण्यात आले आहे.

**सर्व विद्यार्थी सुखरूप**

अपघाताची माहिती मिळताच शाळेचे पाच शिक्षक मदतीसाठी तात्काळ रुग्णालयात पोहोचले. समोरून येणाऱ्या वाहनाला साईड देताना रस्त्याशेजारील माती घसरल्याने हा अपघात झाल्याचा अंदाज आहे. बसमधील सर्व २८ विद्यार्थी सुखरूप आहेत.

– धनंजय तट, मुख्याध्यापक, जनता विद्यालय, पोहरेगाव.

### प्रभात किरणे

जीवनाच्या गाडीला सुखदु:खाची चाके
कधी अंधार कधी उजेड कधी धुके
कधी उतार कधी सपाट कधी चढ
कधी आसू कधी हासू मानावे गोड

-इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

## मराठा सेवा संघातर्फे १५० गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार...



**निलंगा/मोईज सितारी:** – मराठा सेवा संघाच्या वतीने येथील जिजाऊ सृष्टी सभागृहात निलंगा तालुक्यातील १० वी १२ वी तसेच एमबीबीएस ला प्रवेशित व युवा उद्योजक यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी न्यायाधीश व्यंकटराव कदम,उदघाटक गटविकास अधिकारी सतिष पाटील प्रमुख पाहुणे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल ढूमे, पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे, उद्योजक उदय पाटील, डॉ. अरविंद भातांबरे, डॉ. नरसिंह भिकाने, मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव एम एम जाधव,जगद्गुरू तुकोबाराय साहित्य परिषदेचे डी. बी.बरमदे,सतिष हानेगावे,विनोद सोनवणे,संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रमोद कदम,प्राचार्य अशोकराव चव्हाण, समाधानताई माने,ज्ञानेश्वर जाधव आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना माजी न्यायाधीश व्यंकटराव कदम म्हणाले विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये माता पिता व गुरुजनांच्या संस्काराचे मोल अनन्यसाधारण आहे.या संस्काररूपी शिदोरीच्या बळावरच आज गुणवंत म्हणून नामलौकिक केला आहे.त्यामुळे माता पिता व गुरुच्या संस्काराचा हा अनमोल ठेवा आयुष्यात कदापी विसरू नका असा मौलिक सल्ला गुणवंत विध्यार्थ्यांना दिला.

यशस्वी होण्याची गुरुकिल्ली म्हणजे विध्यार्थ्यांनी मी कधीच हरू शकणार नाही हा आत्मविश्वास स्वत:मध्ये निर्माण करावा आणि आपण जे ठरवतो त्याच दिशेने मार्गक्रमण करावे म्हणजे जीवनात यश प्राप्त होईल.गेलेली वेळ कधीच परत येत नाही त्यामुळे वेळेला महत्त्व दिले पाहिजे असे मत उद्योजक उदय पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी व युवा उद्योजकरत्न राम क्षीरसागर,मिथुन दिवे, सदाशिव लोभे यासह स्विमिंग मध्ये राष्ट्रीय पातळीवर काश्य पदक पटकवणारे जलतरणपट्टू हर्षद अंबादास जाधव यांचाही सन्मानचिन्ह व प्रमाणात देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. प्रस्ताविक मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव एम एम जाधव यांनी तर सूत्रसंचालन सतीश हानेगावे आभार अमरदीप पाटील यांनी मानले.कार्यक्रम यशस्वितेसाठी आर के नेलवाडे, अजय मोरे, प्रताप हंगरगे, डी एन बरमदे, माधव गाडीवान, आनंद जाधव, बंटी देशमुख, अजित लोभे, प्रकाश सगरे,चक्रधर शेळके, श्रीमंत जाधव, अंबादास जाधव, किरण धुमाळ,महेश जाधव, आशिष गायकवाड,परमेश्वर बोधले, सिद्धेश्वर तेलंग आदींनी परिश्रम घेतले.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**खाजगी कंपन्यांसाठी 'वर्क फ्रॉम होम' च्या सुचना, शासनाकडून अधिसूचना जारी.**



### चिमटा दयाचा

दरवर्षी पावसाळ्यात तीच समस्या भेडसावते आहे!!
दुर्लक्षतेचा हा परिणाम आहे!!
पुढच्या वर्षीही समस्याची हीच आठवण होणार आहे !!!

## सावकारीच्या प्रत्येक तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ कायदेशीर कारवाई करा –पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे स्पष्ट निर्देश

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात ग्रामीण भागामध्ये अवैध सावकारीच्या घटना घडत असून, त्यातून सर्वसामान्य शेतकरी व गरजू नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी पोलीस प्रशासनाकडे प्राप्त होत आहेत. या प्रकरणांचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांना सावकारीसंदर्भातील प्रत्येक तक्रारीची संवेदनशीलतेने व गांभीर्याने दखल घेऊन कायद्यानुसार तात्काळ गुन्हे नोंद करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे हे नियमितपणे आयोजित करण्यात येणाऱ्या आढावा बैठकीत या विषयाचा विशेष आढावा घेत असून, प्रत्येक तक्रारीवर त्वरित व प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देत आहेत. तसेच, प्रत्येक उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सावकारीच्या प्रकरणांवर स्वतः लक्ष ठेवून कायदेशीर कार्यवाहीची प्रभावी अंमलबजावणी करावी, असेही निर्देश देण्यात आले आहेत.

ग्रामीण भागात सहज उपलब्ध होणाऱ्या कर्जाच्या मोहाला बळी पडून अनेक शेतकरी खासगी सावकारांकडून कर्ज घेतात. मात्र, अनेक प्रकरणांमध्ये अवाजवी व्याजदर आकारले जातात. परिणामी, घेतलेल्या मूळ कर्जापेक्षा अनेक पटींनी अधिक रक्कम व्याजाच्या स्वरूपात वसूल केली जाते. कर्जाची मोठ्या प्रमाणात परतफेड करूनही कर्ज पूर्ण झाल्याचे मान्य केले जात नाही. त्यानंतर कर्जदारांना धमकावणे, शिवीगाळ करणे, जबरदस्तीने उचलून नेणे, शेती किंवा मालमत्तेवर बेकायदेशीर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करणे, कोरे धनादेश किंवा कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या घेणे अशा गंभीर बेकायदेशीर प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे.

काही सावकारांकडे सावकारीचा वैध परवाना असला तरी परवान्यातील अटी व शर्तींचे उल्लंघन करून तसेच कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीर पद्धतीने कर्जवाटप व वसुली केली जात असल्याचेही आढळून येत आहे. अशा सर्व प्रकरणांमध्ये पोलीस ठाण्यात तक्रार प्राप्त होताच सखोल चौकशी करून, परवाना नसताना सावकारी करणारे तसेच परवान्याच्या अटींचे उल्लंघन करणारे सावकार यांच्याविरुद्ध संबंधित कायद्यांनुसार तात्काळ गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत सर्व शेतकरी व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कर्जाची आवश्यकता असल्यास शक्यतो शासकीय बँका, सहकारी संस्था, पतसंस्था, बचत गट किंवा इतर अधिकृत वित्तीय संस्थांमार्फतच कर्ज घ्यावे. कर्जाची किंवा व्याजाची परतफेड करताना रोख व्यवहार टाळून धनादेश, बँक हस्तांतरण अथवा इतर बँकिंग माध्यमांचा वापर करावा. त्यामुळे व्यवहाराचा अधिकृत पुरावा उपलब्ध राहून भविष्यात उद्भवणारे वाद टाळण्यास मदत होईल. अवैध सावकारी, बेकायदेशीर वसुली किंवा सावकारांकडून होणारा कोणताही त्रास सहन न करता नागरिकांनी तात्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी. अशा प्रत्येक तक्रारीवर कायदेशीर, निष्पक्ष व प्रभावी कारवाई करण्यात येईल, असे लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## राममंदिर प्रकरणी दुसरी बाजू समजुन घ्या...

आयोध्यातील भव्य राममंदिरातील पैसे मोजणारे हे चोरी करताना पकडले. त्यांच्याकडून ऐंशी लाखाची रक्कम जप्त केल्याचे वृत्त आहे. ते प्रकरण सीसीटिव्हीमध्ये कैद झाल्याचे समोर आले आहे. मुळात एक बाब लक्षात घ्यावी की, या मंदिरातील चोरीचा व भारतीय जनता पार्टीचा काय संबंध आहे? दुसरे असे की, याच मंदिरातील चोरी झाली अन्य धार्मिक स्थळाच्या ठिकाणी झाली नाही असे घडले नाही. त्याच प्रमाणे एक दुकानदार किंवा मोठ्या कंपनी, बँकेच्या कॅशीयरने पैसे चोरले, भ्रष्टाचार केला तर त्या कंपनीचा मालक किंवा बँक अध्यक्ष, मॅनेजरला जबाबदार धरायाचे का? चोरी करणे ही एक विकृती आहे. समाजात अनेक घरफोड्या होतात. चोऱ्या होतात. लुटले जाते. धार्मिक स्थळाच्या ठिकाणी, बसस्थानकात चोऱ्या, मंगळसुत्र चोरले जाते. ज्या महिलेच्या गळ्यातील मंगळसुत्र चोरले तीला जबाबदार धरणार का? तसे राममंदिराचे झाले आहे. सर्वात प्रथम भाजपाला जबाबदार धरले जात आहे. यामागे केवळ हिंदुंना बदनाम करण्याचा हा मोठा प्रयत्न आहे. हिंदु समाज बदनाम व्हावा असे एक षडयंत्र आहे हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. धार्मिक स्थळात चोऱ्याच काय, काही ठिकाणी इतर धार्मिकस्थळाच्या ठिकाणी काय-काय होते हे सांगायाला लाज वाटते. त्यामुळे भव्य, दिव्य आयोध्येत राममंदिराची उभारणी होते. दोन समाजातील वाद दिर्घ काळानंतर समझोत्याने मिटला ही एक चांगली बाब आहे. सर्व काही हिंदु समाजा समांजस्याने चालत आहे. असे असताना चोरीचे प्रकरण देशभर जागविले जात आहे. हिंदुंच्याधार्मिक स्थळास बदनाम करण्याचा हा डाव असू शकतो हे लक्षात घेतले पाहिजे. मुळात आपल्या देशात ठरवुन काही कार्यक्रम होत असतात. राज्यातील पक्ष आपल्याच पक्षातील मंडळी सोडून जात आहे ते रोखण्यापेक्षा मंदिराचे पैसे खाल्ल्याचा प्रचार करीत आहे हे योग्य नाही. हे घडले तेतर लपून नाही. इतर समाज व धार्मिक स्थळात काय घडले याची यादी दिली तर अनेकांना वाइट वाटेल, मात्र पैसे मोजणाऱ्यांनी चोरी केली हे उघड असताना त्या मंदिरातील मोठा पुजारी व एखाद्या पक्षाला बदनाम करणे योग्य नाही. हा एक कट असू शकतो, हिंदु समजाला बदनाम करण्याचा हा मोठा डाव असू शकतो हे लक्षात घेतले पाहिजे. मुळात आपल्याकडे एखाद्याला कसे बदनाम करायाचे हे मोठे कौशल्य आहे. वास्तविक त्याठिकाणी पक्षाने पैसे-बंडल चोरले असते तर बदनाम करणे योग्य, मात्र भाजपाने पुढाकार घेवुन मंदिराची उभारणी केली तर त्यालाच चोर ठरविणे योग्य नाही. देशात अनेक ठिकाणाच्या धार्मिक स्थळात चोरी झाली, ती ही मोठ्या वस्तू चोरल्या गेल्या आहेत. या बाबत विचार करा. वास्तविक राम मंदिरातील चोरीचे समर्थन करीत नाही तर या प्रकरणी हिंदुंना बदनाम करण्याचा प्रयत्न होते आहे या बाबत वाईट वाटते. चोरीची चौकशी झाली पाहिजे. धार्मिक स्थळाच्या ठिकाणी चोरी करू नये. मोठ्या श्रद्धेने दान-धर्म केलेले असते. हा भावनिक खेळ खेळू नेये. त्यामुळे हिंदुंनी आता जागृत राहीले पाहीजे. हिंदुंनी विचार केला पाहिजे. समाजात भांडण लावण्याचा हा प्रयत्न आहे. यामागील कटकारस्थान लक्षात घेतले पाहिजे. उठसुट राममंदिराबाबत बोलणे टाळले पाहिजे. जे तमात हिंदुचे श्रद्धास्थान आहे त्याला बदनाम करणे योग्य नाही. जे चुकीचे घडले त्याचे समर्थन कोणी करणार ही नाही. हिंदुतर नाहीच. चोरी करणे पाप समजले जाते. कांहींची ही विकृती आहे. काही लायक व्यक्ती नाहीज तेच धार्मिक स्थळात चोरी करतात. यामागील कारणेही शोधली पाहिजेत. मुळात मोठ्या प्रमाणात दान येते. पोतेभरून दान मिळते व मोजणाऱ्यास तुटपुंजी पगार असेल, त्याचे घरचालविणे भागत नसेल तर तो चोऱ्या करणार तर काय करणार? त्यामुळे काही बाबी समजून घेतल्या पाहिजेत. काही बाबीचा विचार केला पाहिजे. नेत्यास, पक्षाला बरीच कामे असताना हा धार्मिकमुद्दा उपस्थित करून हे भांडवल करीत आहेत ते योग्य नाही. तसे पाहिले तर बदनाम करण्याचा जो प्रयत्न चालू आहे याला प्रतिसाद किती मिळत आहे? हिंदुच्या काय इतर मत व पंथाच्या धार्मिकस्थळी चोरी झाली आहे ती झाकून ठेवली, हे जे आज राममंदिराच्या विरोधात चोरी प्रकरणी बोलत आहेत ते इतरा बाबत बोलत नाहीत ही बाब लक्षात घेतली पाहिजे. देशात ज्या बाबी चुकीच्या घडतात त्याना विरोध केला पाहिजे. आज अनेक बाबी चुकीच्या घडत आहेत. ठराविक मंडळी नको ते काम करताना पकडले जात आहेत. ते कोण आहेत. यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. जे चुकीचे आहे त्याचे समर्थन नाही. उघड करीत आहेत याबाबत तक्रार नाही मात्र ज्या पद्धतीने हिंदु समाजाला बदनाम करण्याचा जो केविलवाणी प्रयत्न आहे याबाबत वाईट वाटते. जेवढे मोठे धार्मिकस्थळे आहेत, मग कोणत्याही जाती, धर्म, मत व पंथाचे असोत तेथे कसून चौकशी होते का? यावर कडक सरकार किंवा प्रशासनाची नजर आहे का? धार्मिक स्थळी जो प्रसाद वाटला जातो याची गुणवत्ता तपासली जाते का? महिलांची सुरक्षाबाबत कोणती योजना आखली जाते किंवा सुरक्षा चोख आहे का? ही तपासली जाते का? अनेक प्रश्न धार्मिक स्थळाची आहेत. जनसामान्याची लुट ठराविक करतात यावर नियंत्रण नाही. धार्मिक स्थळाची उभारणी भररस्त्यात होते ते चालते का? त्याच प्रमाणे धार्मिक स्थळात देशविरोधी अतिरेकी लपविले जाते ते योग्य आहे का? या बाबत आंदालने होत नाहीत. या बाबत जनजागृती होत नाही. आवज उठविला जात नाही. राज्यात राममंदिरातील पैसे चोरणारे सापडले आहेत. त्यांनी मान्य ही केले आहे. तरी प्रकरण गाजवित ठेवण्याचा प्रयत्न ठराविकाकडून होत आहे. हेतू वाईट आहे. त्यांना केवळ हिंदुच्या धर्मिकस्थळाची चोरी दिसली इतर ठिकाणाची दिसत नाही. मतासाठी हे राजकारण होत असेल तर ते योग्य नाही. त्यामुळे आता तरी हिंदुंनी जागृत राहीले पाहिजे. एकवटले पाहिजे. मला काय करायाचे, माझे देणे-घेणे नाही हा संकुचित विचार सोडून दिला पाहिजे. वेळीच सावध झाले नाही तर आपल्यातीलच विरोधक बनतील, आजही हिंदुमधील गद्दार व देशद्रोही सापडत आहेत याकडे कानडोळा करून चालणार नाही. ह्या बाबी लक्षात घेवून आज राममंदिरावरून हिंदुंना बदनाम करण्याचा प्रयत्न आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

## 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना'
# शेतकऱ्याच्या नव्या सुरुवातीची गुंतवणूक




नैसर्गिक संकटे, वाढता उत्पादन खर्च आणि कर्जबाजारीपणाच्या दुष्टचक्रात अडकलेल्या शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' जाहीर केली आहे. ही योजना केवळ थकीत कर्ज माफ करण्यापुरती मर्यादित नसून, शेतकऱ्याला पुन्हा उभारी देत ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा व्यापक प्रयत्न आहे.

महाराष्ट्रातील शेती अजूनही मोठ्या प्रमाणावर निसर्गावर अवलंबून आहे. अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, पूर, रोगराई आणि हवामानातील अनिश्चितता यामुळे शेतीचे गणित सातत्याने बिघडत आहे. त्यातच बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि इंधनाच्या वाढत्या खर्चामुळे शेती करणे अधिक खर्चिक बनले आहे. अशा परिस्थितीत शेतकरी पीक कर्ज घेतो; मात्र नैसर्गिक किंवा बाजारातील प्रतिकूल परिस्थितीमुळे वेळेवर परतफेड करणे शक्य होत नाही. परिणामी तो नव्या कर्जासाठी अपात्र ठरतो आणि आर्थिक अडचणींचे चक्र अधिक गहिरे होत जाते.

याच पार्श्वभूमीवर शासनाने राबविलेली ही योजना शेतकऱ्याला नव्याने आर्थिक प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करते. कर्जमुक्तीमुळे शेतकऱ्याला पुन्हा पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, उत्पादनासाठी आवश्यक भांडवल उपलब्ध होईल आणि शेतीतील गुंतवणुकीला चालना मिळेल. त्यामुळे या योजनेकडे केवळ आर्थिक मदत म्हणून नव्हे, तर कृषी क्षेत्राच्या पुनर्बांधणीतील महत्त्वाचा टप्पा म्हणून पाहण्याची गरज आहे.

या योजनेचे एक वैशिष्ट्य म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही विचार करण्यात आला आहे. केवळ थकबाकीदारांना दिलासा देण्यापेक्षा आर्थिक शिस्त पाळणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्याची भूमिका शासनाने स्वीकारली आहे. त्यामुळे कर्जमाफी आणि आर्थिक जबाबदारी यांच्यात संतुलन राखण्याचा प्रयत्न या योजनेत दिसून येतो.

'एकवेळ समझोता' (जपश ढळाश डर्शीीश्रशाशपीं) ही तरतूदही अनेक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरणार आहे. पूर्वी निर्धारित मर्यादेपेक्षा थोडे अधिक कर्ज असल्याने अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहत होते. आता शेतकरी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर शासनाकडून निश्चित मर्यादेपर्यंतचा लाभ मिळू शकणार आहे. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना पुन्हा बँकिंग व्यवस्थेशी जोडले जाण्याची संधी उपलब्ध होईल.

कर्जमुक्तीचा परिणाम केवळ शेतकऱ्यापुरता मर्यादित राहत नाही. शेतकऱ्याच्या हातात आर्थिक तरलता निर्माण झाली की त्याचा लाभ खत-बियाणे विक्रेते, कृषी सेवा केंद्रे, कृषी अवजारे उत्पादक, वाहतूक व्यवसाय, दुग्धव्यवसाय, प्रक्रिया उद्योग तसेच ग्रामीण बाजारपेठेला होतो. त्यामुळे शेतकऱ्याला दिलेला आर्थिक आधार म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मिळालेली नवी ऊर्जा होय.

या योजनेची अंमलबजावणी पूर्णपणे पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यावर शासनाने भर दिला आहे. बँकांकडून पात्र लाभार्थ्यांची माहिती थेट शासनाच्या पोर्टलवर अपलोड केली जात आहे. आधार प्रमाणीकरण, ग्रीस्टॅक प्रणाली, संगणकीय पडताळणी, गावनिहाय लाभार्थी यादी आणि तक्रार निवारण यंत्रणा यामुळे लाभ वितरण अधिक अचूक आणि विश्वासार्ह होणार आहे. त्यामुळे पात्र शेतकरी वंचित राहणार नाहीत आणि अपात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्याची शक्यता कमी होईल.

मात्र, शासनाचा दृष्टिकोन केवळ कर्जमाफीपुरता मर्यादित नाही. कर्जमाफी ही अंतिम उपाययोजना नसून शेतकऱ्याला स्वावलंबनाकडे नेणारी पहिली पायरी आहे. सिंचन सुविधा, कृषी पायाभूत सुविधा, पीक विविधीकरण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग आणि शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे या दीर्घकालीन उपाययोजनांमुळे शेती अधिक सक्षम आणि शाश्वत करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

या योजनेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यामागेही एक अर्थपूर्ण संदेश आहे. लोककल्याण, जलव्यवस्थापन, शेती आणि ग्रामीण विकासाला प्राधान्य देणाऱ्या या दूरदर्शी राज्यकर्तीच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाची योजना जाहीर करून शासनाने इतिहासातील लोकाभिमुख परंपरेला आधुनिक विकासदृष्टीची जोड दिली आहे.

आज शेतकऱ्याला सर्वाधिक गरज आहे ती आर्थिक दिलाशासोबत आत्मविश्वासाची. कर्जाचे ओझे हलके झाले की शेतकरी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यास, उत्पादन वाढविण्यास आणि शेतीकडे उद्योग म्हणून पाहण्यास अधिक सक्षम होतो. त्याचा सकारात्मक परिणाम उत्पादनक्षमता, ग्रामीण रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवरही दिसून येतो.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' ही केवळ कर्जमाफीची योजना नाही; ती शेतकऱ्याच्या नव्या सुरुवातीचा पाया आहे. शेतकऱ्याच्या श्रमांचा सन्मान, आर्थिक पुनर्बांधणी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन विकासाचा व्यापक संकल्प या योजनेतून व्यक्त होतो. सक्षम शेतकरी, सक्षम शेती आणि बळकट ग्रामीण अर्थव्यवस्था यांवरच विकसित महाराष्ट्राची भक्कम पायाभरणी उभी राहणार आहे. त्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वपूर्ण आणि दूरदर्शी पाऊल आहे.

## कर्जमुक्तीपासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत शेतकऱ्यांच्या विकासाचा नवा अध्याय

महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्यांना सातत्याने नैसर्गिक आपत्तींनी छळले आहे. राज्यात व्यापक प्रमाणात सिंचनाच्या सुविधा उपलब्ध झाल्या असल्या, तरी शेतीचा मोठा भाग पर्जन्यपोषित आहे. त्यामुळे खरीपाच्या (आणि रब्बीच्याही) उत्तम हंगामासाठी पर्जनमान हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. अर्थात, चांगला पाऊस पडूनही अनेकदा कीडींच्या प्रादुर्भावाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागतो. या समस्या सुटल्यावर काहीवेळा अवकाळी पावसाचा फटका बसल्यावर हातचे पीक गमावण्याची वेळ शेतकऱ्यांवर ओढवते. पीक चांगले आल्यावर शेतीमालाच्या दरांचा प्रश्नही सातत्याने भेडसावत असतो. शेतकऱ्यांवर येणाऱ्या अशा विविध स्वरुपाच्या संकटांचा विचार करून राज्य शासनाने वेळोवेळी मदतीचा हात दिला आहे.

### कर्जमुक्ती योजनेचा निर्णय

राज्य सरकारने अलिकडेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' जाहीर करून पुन्हा एकदा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. २०१७ मध्ये दीड लाख रुपयांपर्यंत, तर २०१९ मध्ये दोन लाख रुपयांपर्यंत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली होती. यावेळी थेट दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती जाहीर करण्यात आली असून या योजनेची अंमलबजावणी सुरु झाली आहे. अल्पमुदतीची थकीत पीककर्जे,तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित कर्जांचा या योजनेत समावेश आहे. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहेत. महत्त्वाचे म्हणजे कर्जाची रक्कम या मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या शेतकऱ्यांनाही स्वतःच्या हिस्स्याची रक्कम भरल्यावर दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचे लाभ देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलाय. यामुळे शेतकरी पीककर्जासाठी अक्षम ठरणार नाहीत, याची काळजी घेण्यात आली आहे.

### 'त्या' शेतकऱ्यांनाही लाभ

कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही राज्य सरकारने प्रोत्साहनपर दिलासा दिला असून अशा शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन लाभ देण्याची तरतूद या योजनेत आहे. नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेअंतर्गत २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन ३० जून पूर्वी किंवा बँकेच्या नियमानुसार विहित वेळेत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. यासाठी २०२५-२६ व २०२६-२७ या आर्थिक वर्षांतील अल्पमुदत पीक कर्जाचीही वेळेत परतफेड करणे आवश्यक राहील.

### कल्याणकारी योजनांची जोड

राज्य सरकारचे कृषी धोरण शेतकरी केंद्रित आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, उत्पादन खर्च कमी करणे आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, या त्रिसूत्रीवर कृषी विभागाच्या नेतृत्वात विविध योजना राबविल्या जात आहेत. सिंचन सुविधांचा विस्तार, ठिबक व तुषार सिंचनाला प्रोत्साहन, पीकविमा, कृषी यांत्रिकीकरण, फलोत्पादन, सेंद्रिय शेती आणि शेततळ्यांच्या उभारणीसाठीही विविध योजनांद्वारे आर्थिक सहाय्य दिले जात आहे. ऊर्जेच्या खर्चात बचत व्हावी आणि दिवसा अखंडित वीज उपलब्ध व्हावी, यासाठी 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजना' महत्त्वाची ठरली आहे. या योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर सौर पंप बसविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, सिंचनासाठी शाश्वत ऊर्जेचा वापर वाढविण्यावर भर दिला जातोय.

### कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

जगभरात कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान सातत्याने प्रगतीची शिखरे गाठत असताना शेतीचे क्षेत्रही त्यातून सुटलेले नाही. शेतीसाठी लागणारे मानवी श्रम तुलनेने कमी व्हावे आणि शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचे 'स्मार्ट' पर्याय उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने 'एआय' म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या प्रसारवर मोठा भर दिला आहे. पीकांची लागवड, कीडींचे व्यवस्थापन, खत व पाण्याचे अचूक नियोजन, फवारणी, बाजारभावांचे अचूक विश्लेषण, पर्यायी बाजारपेठांची उपलब्धता, हवामानविषयक माहिती अशा अनेक बाबतीत आता 'एआय' साधने राज्यात शेतकऱ्यांसाठी उपलब्ध होत आहेत. याशिवाय शेतमाल साठवणूक, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग, शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रोत्साहन, तसेच डिजिटल सेवांद्वारे शासकीय योजनांची माहिती आणि अर्ज प्रक्रिया सुलभ करण्याचे प्रयत्नही सुरू आहेत. आधुनिक तंत्रज्ञान, आर्थिक सहाय्य आणि पायाभूत सुविधांचा संगम साधत शेतीला अधिक सक्षम, स्पर्धात्मक आणि शाश्वत स्वरूप देण्याचे प्रयत्न राज्य शासनाकडून सुरु आहेत. कर्जमुक्तीपासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंतचा हा प्रवास महाराष्ट्रातील कृषी क्षेत्र आणि पर्यायाने शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्याच्या व्यापक प्रयत्नांचे द्योतक मानला जात आहे.

## इंग्रजी भाषा शिकताना सातत्य राखणे अत्यंत गरजेचे



इंग्रजी भाषा शिकताना सातत्य राखणे अत्यंत गरजेचे आहे. दररोज नवनवीन शब्द शिकणे, त्यांचे वाक्यात उपयोग करणे, आणि रोजच्या संभाषणात सरावाचा समावेश करणे सर्वात महत्त्वाचे आहे. यामुळे भाषेवर सहज प्रभुत्व मिळवता येते आणि आत्मविश्वास वाढतो.इंग्रजी सुधारण्यासाठी खालील मुद्दे अत्यंत उपयुक्त ठरतील:नियमित सराव: दररोज किमान अर्धा तास इंग्रजी वाचन, लेखन किंवा ऐकण्याचा सराव करा. यासाठी तुम्ही बीबीसी न्यूज मराठी किंवा सकाळ सारख्या स्थानिक संकेतस्थळांचे इंग्रजी पर्याय वापरू शकता. शब्दसंग्रह वाढवा: रोज किमान पाच नवीन शब्द शिका आणि ते शब्द वहीत लिहून ठेवा. नवीन शब्दांचा अर्थ समजून घेण्यासाठी शब्दकोश किंवा गुगल भाषांतर चा वापर करा.संभाषण सुरू ठेवा: घरातील व्यक्ती किंवा मित्रांसोबत इंग्रजीत बोलण्याचा प्रयत्न करा. सुरुवातीला चुका होण्याची शक्यता असते, परंतु त्याकडे दुर्लक्ष करून सराव चालू ठेवा.मनोरंजनातून शिका: इंग्रजी गाणी ऐका, बातम्या पहा किंवा यूट्यूब वरील शैक्षणिक व्हिडिओ बघा. यामुळे भाषेचा उच्चार आणि लय समजून घेणे सोपे जाते.व्याकरणाचा पाया पक्का करा: भाषेचे मूळ नियम समजून घेण्यासाठी इंडिया बिक्स सारख्या संकेतस्थळांवरून विविध व्याकरणाचे प्रश्न सोडवा. यामुळे अचूक इंग्रजी लिहिण्यास आणि बोलण्यास मदत होईल.

## लहान मुलांच्या नाकातून रक्तस्त्राव होत असेल तर..



उन्हातून आल्यावर काही लहान मुलांमध्ये नाकातून रक्तस्राव होतो. याला घोळणा फुटणे असे म्हण-तात. यात नाकाच्या पुढच्या भागातल्या नाजूक रक्तवाहिन्या (केशवाहिन्यांचे जाळे) उष्णतेने फुगून फुटतात व रक्त येते.काही वेळा अतिरक्तदाब किंवा रक्ताच्या कर्करोगात पण घोळणा फुटतो. म्हणून वारंवार असा त्रास होत असल्यास तज्ज्ञास दाखवावे.प्रथमोपचार-रक्तस्राव सुरू असताना जास्त हालचाल न करता बसून राहावे. डोके पुढे झुकलेले ठेवावे. म्हणजे रक्त गिळले जाणार नाही.ऍड्रेनॅलिन स्प्रे उपलब्ध असल्यास नाकात एकदा फवारा मारावा. याने रक्तवाहिन्या आकसून रक्तस्राव थांबतो. वाटल्यास ५ मिनिटांनी परत एकदा मारावा. मात्र अतिरक्तदाबाच्या रुग्णांना हा उपचार करू नये. नाकाचा पुढचा भाग हाताच्या बोटाने २-५ मिनिटे दाबून धरावा. याने रक्तवाहिन्यांतून रक्त येणे बंद होते. नाकाला व गालांना थंडगार पाणी किंवा बर्फ लावल्याने रक्तवाहिन्या आकुंचन पावून रक्तस्राव थांबायला मदत होते. रक्तस्राव थांबल्यावर उशी घेऊन उताणे निजून राहावे.

**कारणे**

- नाकाला जखम होणे
- कष्टाचं काम
- उच्च रक्तदाब
- उंचीवरच्या प्रदेशात जाणे
- नाक फार जोरानं शिंकरणे

**नाकातून रक्त आल्यास काय करावे**

खाली बसावे, थोडेसे पुढे झुकावे म्हणजे रक्त हे आपल्या घशात जाणार नाही.थंड, ओला कपडा आपल्या नाकाखाली धरावा म्हणजे आपल्या नाकातील रक्तवाहिन्या आकुंचित होऊन रक्तस्राव थांबेल.रक्त हे एकाच नाकपुडीतून येत असेल तर, त्या नाकपुडीच्या वरच्या भागात घट्ट दाबून धरावे.दोन्ही नाकपुड्यांतून रक्त येत असेल तर, आपल्या नाकपुड्या किमान दहा मिनिटे दाबून धराव्यात. तरीही रक्तस्राव चालूच राहिल्यास, आणखी दहा मिनिटे दाब द्यावा.रक्तस्राव हा नाकाला थेट झालेल्या जखमेमुळं झाला असेल तर, केवळ हलकाच दाब द्यावा.जोरदार रक्तस्राव चालूच राहिल्यास किंवा नाकातून वारंवार चालू राहिल्यास, एखाद्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## हवामान बदलाचा 'गोड' साक्षीदार: उन्हाळ्याचा निरोप घेताना जांभळाचा मनसोक्त आनंद घ्या!

कडक उन्हाचा तडाखा आता ओसरू लागला असून, पावसाळ्याच्या पहिल्या सरींची चाहूल लागली आहे. ऋतू बदलाच्या या काळात निसर्ग आपल्याला एक खास भेट देतो, ती म्हणजे रसाळ आणि औषधी गुणधर्मांनी युक्त 'जांभूळ'! उन्हाळ्याचा हा शेवटचा मेवा पावसाळा पूर्णपणे स्थिरावण्यापूर्वीच बाजारातून निरोप घेतो, त्यामुळे सध्या या फळावर ताव मारण्याची हीच योग्य वेळ आहे.

अन्न हे केवळ भूक भागवण्याचे साधन नसून ते आपल्या आरोग्याचा मुख्य आधार आहे. निरोगी जीवनासाठी सुरक्षित, पौष्टिक आणि गुणवत्तापूर्ण अन्न मिळणे हा आपला ...

केवळ चवच नाही, तर आरोग्याचा खजिना

अनेकदा 'जावा प्लम' किंवा 'इंडियन ब्लॅकबेरी' म्हणून ओळखले जाणारे हे फळ केवळ चवीलाच नाही, तर आरोग्याच्या दृष्टीनेही अतिशय लाभदायी आहे. यात प्रोटीन, फायबर, व्हिटॅमिन सी आणि पोटॅशियमचा खजिना दडलेला आहे.

**जांभळाचे आरोग्यासाठी फायदे:**

**इम्युनिटी बूस्टर:** पावसाळ्याच्या सुरुवातीला होणारे संसर्ग टाळण्यासाठी जांभळातील अँटिऑक्सिडेंट्स आपली रोगप्रतिकारशक्ती बळकट करतात.

**डायबिटीस नियंत्रण:** रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी जांभूळ अत्यंत गुणकारी मानले जाते.

**पाचनशक्ती:** पचनसंस्था सुधारण्यासाठी आणि पोट साफ ठेवण्यासाठी हे फळ उत्तम कार्य करते.

**दाहशामक गुणधर्म:** शरीरातील सूज कमी करण्यास मदत करणारे अँटी-इन्फ्लॅमेटरी घटक यात असतात. खाण्याची खरी पद्धत-जांभूळ खाण्याची खरी मजा ही त्यावर थोडं काळं मीठ आणि तिखट चटणी पेरून खाण्यात आहे. ही चव केवळ जिभेचे चोचले पुरवत नाही, तर पावसाळ्याच्या पहिल्या सरींसोबत एक वेगळाच आनंद देऊन जाते.

**महत्त्वाची टीप:** पावसाळा जोरात सुरू झाला की जांभळाचा हंगाम संपतो. त्यामुळे, या उरलेल्या दिवसांत निसर्गाची ही खास देणगी चाखायला विसरू नका!

# पालकांनी मुलांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जायला प्रोत्साहित करावे: बाबासाहेब पाटील

**लातूर/प्रतिनिधी:** आजच्या काळात पालकांनी संपत्ती जपण्यापेक्षा संतती जपण्यास प्राधान्य देणे आवश्यक बनले आहे. आपल्या मुलांवर चांगले संस्कार करावेत.संस्कार हे पुस्तकात मिळत नाहीत तर कुटुंबात मिळतात. मुलांना आपल्या आवडीप्रमाणे नव्हे तर त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात जायला प्रोत्साहित करावे तरच त्यांचे भवितव्य उज्वल घडेल असा विश्वास राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केला.

श्री केशवराज शैक्षणिक संकुलाच्या वतीने दि.६/७/२०२६ रोजी दयानंद सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या गुणवंतांचा गुणगौरव सोहळा कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख हे होते.प्रमुख मार्गदर्शक म्हणून लातूरच्या अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती शिल्पाताई करमरकर ह्या मंचावर उपस्थित होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून छत्रपती संभाजीनगरचे प्रसिद्ध उद्योजक विवेक देशपांडे यांची उपस्थिती होती. यावेळी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, अविनाश तळणीकर,केंद्रीय विद्यासभा संयोजक महेश कस्तुरे,श्री केशवराज शैक्षणिक संकुलचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, कार्यवाह शैलेश




कुलकर्णी,शालेय समितीचे अध्यक्ष (माध्य.) गंगाधर खेडकर, रेनिसन्स सीबीएसई स्कूल अध्यक्ष प्रा.कृष्णा जाधव, केशव शिशुवाटिका अध्यक्षा वर्षा डोईफोडे, मुख्याध्यापक (माध्यमिक) शैलेंद्र कंगळे, मुख्याध्यापक (प्राथमिक) शिवाजी हेंडगे,रेनिसन्स सीबीएसईच्या प्राचार्या सोनाली दर्डा, शिशुवाटिका प्रधानाचार्या अवंती कुलकर्णी आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी बाबासाहेब पाटील आणि इतर मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह सत्कार करण्यात आला.

आपल्या मार्गदर्शनात बाबासाहेब पाटील यांनी जीवनात आज विद्यार्थी,आई, वडील यांच्यातील सुसंवादाची कमतरता झाल्याचे सांगितले.पालकांनी मुलांना हिणवण्याऐवजी त्यांचे कौतुक करावे. त्यांना प्रोत्साहन द्यावे.मुलांना त्यांच्या बुद्ध्यांकाप्रमाणे शिकू द्या. प्रत्येकाने आपल्या कामाला न्याय दिल्यास त्यासारखा दुसरा आनंद नसतो. आपल्याला सहकार मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. आपण या क्षेत्रासाठी जेवढे चांगले करता येईल तेवढे करत आहोत. चांगल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांप्रमाणे आदर्श शेतकरी घडला पाहिजे यासाठी प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रमुख मार्गदर्शक शिल्पाताई करमरकर यांनी आपल्या मार्गदर्शनात श्री केशवराज विद्यालयाने दिलेल्या मजबूत वैचारिक पायामुळेच आपण जीवनात यशस्वी होऊ शकल्याचे सांगितले. या शिक्षण संस्थेत शिक्षण घेतलेला एकही विद्यार्थी आयुष्यात असफल होत नाही.एवढी तात्विक मजबुती येथील शिक्षकवृंद विद्यार्थ्यांना प्रदान करतात,असेही त्यांनी गौरवाने नमूद केले. विवेक देशपांडे यांनीही आपल्या मनोगतात या संस्थेत शिकल्यामुळेच जीवनात यशस्वी होऊ शकलो, या संस्थेच्या लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयातील कठोर शिस्तीने जीवन घडवल्याचे सांगितले.

अध्यक्षीय समारोप प्रवीण सरदेशमुख यांनी केला.त्यामध्ये त्यांनी पालकांना मुलांकडून खूप अपेक्षा असतात, त्याप्रमाणे नक्कीच घडत असते असे सांगितले.विद्यार्थ्यांनी आयुष्यात आपले ध्येय छोटे ठेवू नये असेही त्यांनी आग्रहाने नमूद केले. त्याचप्रमाणे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या प्रगतीची वाटचालही त्यांनी थोडक्यात सांगितली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश कस्तुरे यांनी केले.प्रास्ताविकात त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागची पार्श्वभूमी सविस्तरपणे विशद केली. श्रीमती कांचन तोडकर यांनी सरस्वती स्तवन प्रस्तुत केले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या वतीने आदित्य गरड, कु.अमृता गोस्वामी,कृष्णा कच्छवे, कु.वेदिका मामडगे यांनी मनोगत व्यक्त केले. संतोष बीडकर यांनी वैयक्तिक गीत सादर केले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन श्रीमती अर्चना ठोंबरे व लक्ष्मण गिराम यांनी केले. दहावी प्रमुख अर्चना ठोंबरे, सहप्रमुख लक्ष्मण गिराम, सीबीएसई विभागातील दहावी प्रमुख विनोद जाधव यांचा या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जितेंद्र जोशी,शैला सांगवीकर यांनी तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे यांनी केले. सामूहिक कल्याणमंत्राने या कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर,अंजली निर्मळे,धनंजय कुलकर्णी, राम जोशी, श्री केशवराज कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रमुख रेखा पुरी, गुरूनाथ झुंजारे,राहूल गायकवाड, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## लातूर तालुक्यात 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहीम सुरु

*मतदारांनी सहकार्य करण्याचे आवाहन*

**लातूर/प्रतिनिधी:** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत मतदारयादी अद्ययावत करण्याची मोहीम लातूर जिल्ह्यात सुरू करण्यात आली आहे. या विशेष मोहिमेअंतर्गत सन २००२ च्या मतदार यादीशी सर्व मतदारांचे मॅपिंग म्हणजेच पडताळणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या मतदारांचे मॅपिंग होणार नाही, त्यांना पुढील काळात मतदार नोंदणी अधिकाऱ्यांसमोर सुनावणीच्या प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे. ही संभाव्य प्रक्रिया टाळण्यासाठी मतदारांनी तातडीने आपले मतदार मॅपिंग करून घ्यावे, असे आवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

या मोहिमेसाठी लातूर तालुक्यातील सर्व मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व पर्यवेक्षक यांना मतदारांचे मॅपिंग करणे, अस्पष्ट फोटो गोळा करून ते अद्ययावत करणे आणि डीएसई नोंदींची पडताळणी करणे या कामांसाठी ०१ जुलै २०२६ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत पूर्णवेळ कार्यमुक्त करण्यात आले आहे. हे अधिकारी या कालावधीत मतदारांच्या घरोघरी भेट देऊन माहिती संकलन, ईएफ वाटप व जमा करणे आणि डिजिटायझेशनचे काम ३० जून २०२६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत पूर्ण करणार आहेत. या मोहिमेच्या वेळापत्रकानुसार २० जून ते २९ जून २०२६ दरम्यान बीएलओंचे प्रशिक्षण व मतदारयादी छपाईचे काम पूर्ण झाले असून, घरोघरी जाऊन माहिती संकलन केल्यानंतर ०५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध केली जाईल, ज्यामध्ये केवळ गणना प्रपत्र भरलेल्या व डिजिटायझेशन झालेल्या मतदारांचीच नावे समाविष्ट असतील.

यानंतर ०५ ऑगस्ट ते ०४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मतदारांना दावे व हरकती दाखल करता येतील, ज्यामध्ये नवीन मतदार नोंदणीसाठी फॉर्म नंबर ६, नाव वगळण्यासाठी फॉर्म नंबर ७ आणि दुरुस्तीसाठी फॉर्म नंबर ८ भरण्याची संधी उपलब्ध असेल. या कालावधीत प्राप्त झालेल्या हरकती, अनमॅप्ड मतदार आणि नावात विसंगती असलेल्या मतदारांबाबतच्या सुनावणीचा व दावे-हरकती निकाली काढण्याचा कालावधी ०५ ऑगस्ट ते ०३ ऑक्टोबर २०२६ असा असेल. ०७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदारयादी नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली जाईल.

सुनावणीच्या वेळेस जन्मदाखला, पासपोर्ट, जात प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक प्रमाणपत्र, कुटुंब नोंदवहीची प्रत, सरकारी जमीन किंवा घराचे दस्तऐवज, सरकारी ओळखपत्र, वन हक्क प्रमाणपत्र, राष्ट्रीय नागरिक नोंदणी किंवा १ जुलै १९८७ पूर्वी सरकारी संस्था, बँक, पोस्ट अथवा एलआयसीने दिलेले ओळखपत्र या ११ मान्यताप्राप्त कागदपत्रांपैकी एक पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

या कार्यक्रमांतर्गत वयोगटानुसार मॅपिंगचे नियम ठरवून देण्यात आले असून, सन २००२ च्या यादीत नाव असलेल्या मतदारांना केवळ मॅपिंग पूर्ण करावे लागेल आणि त्यांना अतिरिक्त कागदपत्रांची गरज भासणार नाही. १ जुलै १९८७ पूर्वी जन्मलेल्या परंतु यादीत नाव नसलेल्या मतदारांना जन्मतारीख व जन्मस्थळ सिद्ध करणारे ११ पैकी एक कागदपत्र द्यावे लागेल; तर १ जुलै १९८७ ते २ डिसेंबर २००४ दरम्यान जन्मलेल्या मतदारांना स्वतः च्या दाखल्यासोबत आई किंवा वडिलांपैकी एकाचे जन्मतारीख व जन्मस्थळ सिद्ध करणारे कागदपत्र सादर करावे लागेल. तसेच २ डिसेंबर २००४ नंतर जन्मलेल्या मतदारांना स्वतःच्या पुराव्यांसह आई आणि वडील या दोघांचेही जन्मतारीख व जन्मस्थळ सिद्ध करणारे दस्तऐवज देणे बंधनकारक राहील. ज्यांचे २००२ च्या मतदार यादीत नाव नसेल किंवा त्यानंतर नाव नोंदणी झाली असेल, त्यांची पडताळणी आई-वडील तसेच आजी-आजोबांच्या नावाच्या आधारे केली जाणार आहे.

माहिती संकलनासाठी बीएलओ मतदारांच्या घरी तीन वेळा भेट देतील आणि मतदार घरी उपलब्ध न मिळाल्यास त्यांच्या घराबाहेर नोटीस चिकटवली जाईल. तीनही भेटींनंतरही संपर्क न झाल्यास संबंधित मतदाराला फॉर्म भरण्याची संधी मिळणार नाही आणि जे मतदार ही प्रक्रिया पूर्ण करणार नाहीत, त्यांना मतदार याद्यांच्या सखोल पुनरिक्षण मोहिमेच्या वेळी सुनावणी व पुराव्यांच्या पडताळणीनंतरच मतदार यादीत नाव समाविष्ट करता येईल, त्यामुळे सर्व मत दारांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# ९००० हून अधिक बालकांचे लसीकरण मध्य रेल्वे वर पल्स पोलिओ लसीकरण मोहीम यशस्वीपणे राबवली

**मुंबई/प्रतिनिधी:** मध्य रेल्वेने दिनांक २९.०६.२०२६ ते दिनांक ०३.०७.२०२६ या कालावधीत आपल्या सर्व विभागांमध्ये 'पल्स पोलिओ लसीकरण मोहीम' यशस्वीपणे राबवली. ही मोहीम राज्य सरकार आणि स्थानिक महानगरपालिका प्रशासनाच्या समन्वयाने दिनांक २८.०६.२०२६ ते दिनांक ०३.०७.२०२६ या कालावधीत राबवल्या जाणाऱ्या 'राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण कार्यक्रमा'चा एक भाग आहे. ० ते ५ वयोगटातील मुलांचे संपूर्ण लसीकरण सुनिश्चित करणे आणि 'पोलिओ-मुक्त भारत' घडवण्याच्या देशाच्या संकल्पाला बळकट करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

रेल्वे स्थानकांवर लसीकरणासाठी निश्चित केंद्रे आणि लसीकरण कक्ष पूर्ण तयारीसह उभारण्यात आले होते. प्रत्येक लसीकरण कक्षामध्ये तोंडावाटे दिली जाणारी पोलिओ लस, कोल्ड-चेन उपकरणे, लस वाहक, आवश्यक साधनसामग्री आणि इतर साहित्याचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यात आला होता. हा कार्यक्रम सुरळीतपणे राबवण्यासाठी वैद्यकीय अधिकारी, नर्सिंग अधिकारी, पॅरामेडिकल पथके आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांनी परस्पर समन्वयाने काम केले. निश्चित लसीकरण कक्ष, बाह्य संपर्क केंद्रे आणि प्रवाशांची वर्दळ असलेल्या महत्त्वाच्या ठिकाणी ० ते ५ वयोगटातील मुलांना पोलिओची लस देण्यात आली.



लसीकरणापासून वंचित राहिलेल्या मुलांपर्यंत पोहोचण्यासाठी घरोघरी जाऊन लसीकरण करण्याची मोहीमही राबवण्यात आली.

मध्य रेल्वेच्या कार्यक्षेत्रात एकूण ९०१७ मुलांना पोलिओची लस देण्यात आली. यामध्ये मुंबई विभागात १६४९, पुणे विभागात २५५४, भुसावळ विभागात १०२०, नागपूर विभागात २८७७ आणि सोलापूर विभागात ९१७ मुलांचा समावेश होता.

या मोहिमेदरम्यान मार्गदर्शक तत्त्वांचे पालन, कोल्ड-चेनची देखभाल आणि कागदपत्रांची पूर्तता यांवर लक्ष ठेवण्यासाठी वरिष्ठ आरोग्य अधिकारी आणि पर्यवेक्षक पथकांनी प्रत्यक्ष पाहणी केली. ही संपूर्ण मोहीम कोणत्याही विपरीत घटनेशिवाय किंवा व्यवस्थापकीय व्यत्ययाशिवाय यशस्वीपणे पार पडली.

सार्वजनिक आरोग्य आणि पोलिओ निर्मूलनाच्या राष्ट्रीय मोहिमेप्रती भारतीय रेल्वेची कटिबद्धता अधोरेखित करत, पात्र मुलांपर्यंत जास्तीत जास्त लसीकरण पोहोचवण्यासाठी 'पल्स पोलिओ लसीकरण कार्यक्रमा'ची पथके अथक परिश्रम घेत आहेत.

## कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेची लातूर जिल्ह्यात विशेष अंमलबजावणी; अर्ज करण्याचे आवाहन


**लातूर/प्रतिनिधी:** भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेचा पात्र लाभार्थ्यांना लाभ पोहोचवण्यासाठी लातूर जिल्ह्यात १९ जून २०२६ ते २० जुलै २०२६ या कालावधीत विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत आहे. ही योजना ऑगस्ट २०२० मध्ये आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत सुरू करण्यात आली असून, याद्वारे पीक काढणीनंतरची कृषी पायाभूत सुविधा आणि सामुदायिक शेतीसाठी आवश्यक सुविधांची निर्मिती करण्यासाठी सवलतीच्या कर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. या योजनेमुळे शेतमालाचे मूल्यवर्धन, साठवणूक, प्रक्रिया, वाहतूक व विपणन यांना चालना मिळून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना बँकांमार्फत मंजूर होणाऱ्या २ कोटींपर्यंतच्या कर्जावर ३ टक्के व्याज सवलत, तसेच क्रेडिट गॅरंटीची सुविधा शासनामार्फत उपलब्ध करून दिली जाते.

या योजनेअंतर्गत गोदामे, शीतगृहे, पॅक हाऊस, ग्रेडिंग व सॉर्टिंग युनिट, प्राथमिक प्रक्रिया केंद्रे, कृषी लॉजिस्टिक्स, सायलो, रिपनिंग चेंबर, ई-मार्केट सुविधा, जैव-इनपुट उत्पादन युनिट आणि कस्टमर हायरिंग सेंटर यांसारख्या इतर कृषी पायाभूत सुविधा प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेसाठी वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी किंवा संस्था, प्राथमिक कृषी पतसंस्था, सहकारी संस्था, कृषी उद्योजक, स्टार्टअप्स, स्वयं सहायता गट आणि कृषी क्षेत्रातील इतर संस्था पात्र लाभार्थी आहेत. या विशेष मोहिमेदरम्यान लातूर जिल्ह्यात व्यापक जनजागृती, शेतकरी मेळावे, कार्यशाळा, बँक समन्वय बैठका आणि लाभार्थी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील पात्र शेतकरी व संस्थांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आपल्या तालुका कृषी अधिकारी, आत्मा, कृषी विभाग अथवा जवळच्या राष्ट्रीयीकृत व अनुसूचित बँकेशी संपर्क साधावा. तसेच जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था आणि कृषी उद्योजकांनी कृषी पायाभूत सुविधा उभारण्यासाठी पुढाकार घ्यावा. या योजनेचा लाभ घेण्यासाठी https://agriinfra.dac.gov.in या संकेतस्थळावर आपले ऑनलाइन आवेदन सादर करावे, असे आवाहन लातूरच्या 'आत्मा' प्रकल्प संचालकांनी केले आहे.

## समीक्षक किशन उगले यांची पसायदान पुरस्कारसाठी निवड

**लातूर-पुणे/ प्रतिनिधी :** येथील संत ज्ञानेश्वर महाराज प्रतिष्ठान व संत तुकाराम महाराज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या समाधीस सातशे पन्नास वर्षे व संत तुकाराम महाराज यांच्या वैकुंठ गमनास तीनशे पन्नास वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्ताने राज्यस्तरीय पसायदान हरिपाठ रसग्रहण व संत तुकाराम महाराज अभंगवाणी याविषयी रसग्रहण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती यामध्ये महाराष्ट्रातील अडीच हजाराहुन संत साहित्य अभ्यासक किर्तनकार प्रबोधनकार प्रवचनकार बुवांनी संत साहित्यिकांनी रसग्रहणात्मक लेखन करून सहभाग नोंदवला होता यामध्ये किशन दत्तात्रय उगले शेकापूरकर यांचे रसग्रहणात्मक लेखन अतिशय मार्मिक भाष्य करणारे ठरले त्यांच्या पसायदान व हरिपाठ आणि संत तुकाराम महाराज अभंगवाणी वरील रसग्रहणात्मक लेखनाने प्रथम क्रमांक पटकावला आहे त्याबद्दल किशन उगले यांचा आषाढी एकादशी सोहळ्याच्या दिवशी पंढरपूर जिल्हा सोलापूर येथे प्रतिष्ठानच्या वतीने रोख रक्कम शाल श्रीफळ स्मृतिचिन्ह सन्मानपत्र देऊन जाहीर सत्कार व पुरस्कार वितरण करण्यात येणार आहेअसे प्रतिष्ठानचे अध्यक्ष थोर विचारवंत साहित्यिक किर्तनकार प्रवचनकार सुनील अभ्यंकर महाराज यांनी माहिती दिली. किशन उगले शेकापूरकर यांची या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल अनेक मान्यवरांनी साहित्यिक किर्तनकार प्रबोधनकार प्रवचनकार सर्व स्तरातून हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे.



## जुन्या वादातून बेदम मारहाण; तिघांवर गुन्हा

**लातूर/प्रतिनिधी:** जुन्या वादाची कुरापत काढून, एका तरुणाला ढाब्यावर बोलावून लाथाबुक्क्यांनी आणि काठीने बेदम मारहाण केल्याची घटना रेणापूर तालुक्यातील खानापूर येथे घडली. या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी किशोर बाबाराव भांगे यांना आरोपी सहदेव जाधव आणि त्याच्यासोबत असलेल्या इतर दोघांनी अनिकेत ढाब्यावर बोलावून घेतले. आरोपींनी त्यांना शिवीगाळ केली व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. 'तुला खल्लास करून टाकू', अशी जिवे मारण्याची धमकीही देण्यात आली. या प्रकरणी रेणापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

# रेल्वे परिसरातील सार्वजनिक आरोग्य बळकट करण्यासाठी सोलापूर विभागात आरोग्य व मलेरिया निरीक्षकांचे पुनर्ताजगी प्रशिक्षण

**सोलापूर/प्रतिनिधी:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात रेल्वे परिसरातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने ३ जुलै २०२६ रोजी डॉ. कोटनिस स्मारक रेल्वे रुग्णालय, सोलापूर येथे आरोग्य व मलेरिया निरीक्षकांसाठी एकदिवसीय पुनर्ताजगी (रिफ्रेशर) प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या प्रशिक्षणाचा उद्देश आरोग्य व मलेरिया निरीक्षकांचे व्यावसायिक ज्ञान, तांत्रिक कौशल्य आणि कार्यक्षमतेत वाढ करणे हा होता. सार्वजनिक आरोग्य प्रशासन, स्वच्छता व्यवस्थापन, अन्न सुरक्षा, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, पर्यावरण संरक्षण, शिस्तभंग नियम तसेच खरेदी प्रक्रियेतील नव्या घडामोडींची माहिती प्रशिक्षणाद्वारे देण्यात आली. या प्रशिक्षणात सोलापूर विभागातील १५ मुख्य आरोग्य निरीक्षक व आरोग्य निरीक्षक सहभागी झाले होते.

प्रशिक्षणादरम्यान विविध तज्ज्ञांनी महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन केले. यात आचारसंहिता, शिस्त व अपील नियम, माहितीचा अधिकार कायदा, सुरक्षित पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन, अन्न व पाण्याचे नमुने वैज्ञानिक पद्धतीने संकलित करून प्रयोगशाळेत पाठविण्याची प्रक्रिया, प्रदूषण व त्याचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, सरकारी ई-मार्केटप्लेस (GeM) निविदा प्रक्रिया, यात्रा-जत्रा व उत्सव काळातील आरोग्य सज्जता तसेच अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि जलजन्य आजारांच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा समावेश होता.



या पुनर्ताजगी प्रशिक्षणामुळे सहभागी निरीक्षकांना प्रत्यक्ष कामकाजासाठी आवश्यक अद्ययावत माहिती व व्यावहारिक मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे रेल्वे परिसरातील आरोग्य, स्वच्छता आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यास अधिक बळ मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या समारोपावेळी सोलापूर विभागाचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक यांनी सर्व सहभागी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्रांचे वितरण केले.

मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग अशा क्षमता-वृद्धी उपक्रमांद्वारे आपल्या अग्रपंक्तीतील आरोग्य कर्मचाऱ्यांचे कौशल्य सातत्याने विकसित करत असून, रेल्वे परिसरात स्वच्छ, सुरक्षित व निरोगी वातावरण निर्माण करण्यासाठी तसेच प्रवाशांना अधिक दर्जेदार आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# शेतीच्या वादातून विवाहितेचा विनयभंग करणाऱ्या दोघांना तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा पोलीस दलाने दाखल केलेल्या गुन्ह्याचा प्रभावी तपास, सक्षम पुरावे आणि न्यायालयीन पाठपुराव्यामुळे शेतीच्या वादातून विवाहित महिलेचा विनयभंग करणाऱ्या दोघांना न्यायालयाने तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणातील पीडित महिला या उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तोंडचिर (ता. उदगीर) येथील रहिवासी असून, दिनांक १३ एप्रिल २०२२ रोजी सायंकाळी सुमारास त्या त्यांच्या वाटणीच्या शेतात ट्रॅक्टरद्वारे नांगरणी करण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी दयानंद मारोती धनाडे (वय ४५ वर्षे)

रतनबाई मारुती धनाडे (वय ७५ वर्षे), दोघेही रा. तोंडचिर, ता. उदगीर यांनी ट्रॅक्टर चालकास तेथून हाकलून लावले. त्यानंतर पीडित महिलेस शिवीगाळ करून तिच्याशी झटापट केली, तिचा ब्लाऊज फाडून तिचा विनयभंग केला तसेच तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. या घटनेदरम्यान पीडितेच्या मुलीलाही मारहाण करण्यात आली. पीडित महिलेच्या तक्रारीवरून उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १४४/२०२२ अन्वये भारतीय दंड संहितेच्या कलम ३२३, ५०४, ५०६, ३५४, ३५४(ब) व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक आर. एम. तारू यांनी करून आवश्यक पुरावे संकलित केले व न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर खटल्यामध्ये सरकारी अभियोक्ता अड. ए. एस. कदम यांनी सरकारतर्फे प्रभावी युक्तिवाद केला. पीडित महिला, जखमी साक्षीदार यांची साक्ष तसेच वैद्यकीय पुरावे न्यायालयाने ग्राह्य धरले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्री. व्ही. आर. घराळ यांनी दिनांक ०४ जुलै २०२६ रोजी दोन्ही आरोपींना दोषी ठरवत भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमान्वये तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. या खटल्याच्या यशस्वी न्यायालयीन पाठपुराव्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रायल मॉनिटरिंग सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. शिवशंकर मनाळे, पैरवी अंमलदार पोलीस हवालदार अक्रम शेख तसेच पोलीस नाईक जगताप यांनी विशेष परिश्रम घेतले.

# बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न

## दोघा आरोपींना ३ वर्षांचा कारावास व प्रत्येकी १०,००० दंड

**लातूर/प्रतिनिधी :** शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या शासनाची फसवणूक व बनावट कागदपत्रांचा वापर करून नोकरी मिळविण्याच्या प्रयत्नाच्या प्रकरणात प्रभावी तपास, सक्षम पुरावे आणि न्यायालयीन पाठपुराव्याच्या बळावर दोन्ही आरोपींना न्यायालयाने दोषी ठरवत तीन वर्षांच्या कारावासाची तसेच प्रत्येकी १०,००० दंडाची शिक्षा याबाबतची थोडक्यात पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, फिर्यादी बळीराम टोपाजी चव्हाण, तत्कालीन गटविकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दिनांक २३ फेब्रुवारी २००८ रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक ४५/२००८ अन्वये भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१ व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, श्रीराम ज्ञानेश्वर पाटील, रा. रामकृष्ण नगर, निलंगा ज्ञानेश्वर वसंतराव दोडतल्ले, रा. माळेगाव, ता. निलंगा यांनी ग्रामसेवक पदाच्या भरती प्रक्रियेदरम्यान अर्जासोबत बनावट व खोटे दिव्यांग प्रमाणपत्र सादर करून शासनाची दिशाभूल करत नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकाराची दखल घेत संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. डी. एस. बिराजदार यांनी करून आवश्यक पुरावे संकलित केले व न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

या खटल्यात सरकारी अभियोक्ता श्री. रामेश्वर ढेले यांनी सरकारतर्फे प्रभावी युक्तिवाद केला. फिर्यादी अधिकारी, जिल्हा परिषदेतील दोन अधिकारी, तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक तसेच तपास अधिकारी यांच्या साक्षी न्यायालयाने महत्त्वपूर्ण मानल्या. तसेच संबंधित दिव्यांग प्रमाणपत्र जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातून कधीही निर्गमित झाले नसल्याचे पुराव्यांद्वारे सिद्ध झाल्याने आरोपींविरुद्धचा गुन्हा निर्विवादपणे सिद्ध झाला.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती एम. एन. चव्हाण यांनी दिनांक ०४ जुलै २०२६ रोजी आरोपी श्रीराम ज्ञानेश्वर पाटील व ज्ञानेश्वर वसंतराव दोडतल्ले यांना भारतीय दंड संहितेच्या कलम ४१७ व ४६८ अन्वये तीन वर्षांच्या कारावासाची तसेच प्रत्येकी १०,००० दंडाची शिक्षा सुनावली.

या खटल्याच्या यशस्वी न्यायालयीन पाठपुराव्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रायल मॉनिटरिंग सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. शिवशंकर मनाळे तसेच पैरवी अंमलदार सचिन उस्तुरगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जि.प. सदस्य व पंचायत समिती सदस्यांच्या मानधनात वाढ करा: जयश्री तवले यांची मागणी




**लातूर/प्रतिनिधी :** मागील तेरा वर्षापासून जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य यांच्या मानधनात कसलीही वाढ झाली नाही. त्यामुळे जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य यांच्या मानधनात वाढ करण्यात यावी अशी मागणी मुरुड जिल्हा परिषद सदस्या जयश्री तवले यांनी लातूर जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील तळेगावकर यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्हा परिषद सदस्य मानधन २५ हजार रुपये व पंचायत समिती सदस्य यांचे मानधन १२५०० रुपये मानधनात वाढ करण्याचा ठराव मंगळवार दि ७ जुलै रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत घेण्यात यावा असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. १४ मार्च २०१३ रोजी जिल्हा परिषद सदस्य मानधन ३००० रुपये व पंचायत समिती सदस्य यांचे मानधन १२०० रुपये करण्याचा शासन निर्णय झाला.

मागील तेरा वर्षात मानधनात वाढ झालेली नाही.ज्याप्रमाणे सरपंचाचे मानधन हे लोकसंख्येच्या आधारे दिले जाते त्याच पद्धतीने जिल्हा परिषद ,पंचायत समिती सदस्याचे सुद्धा मानधन लोकसंख्येच्या आधारे द्यावे असा ठराव घ्यावा अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.वाढीव मानधनाचा ठराव घेऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व ग्राम विकास मंत्री यांच्याकडे पाठवावा अशी विनंती या निवेदनात करण्यात अली आहे.

निवेदन देताना पंचायत समिती सदस्या सुचित्रा अंधारे, पंचायत समिती सदस्य पंकज गायकवाड, लक्ष्मीकांत तवले,अक्षय चव्हाण,मोहित डोळसे आदी उपस्थित होते.

# दुकानातून घेतलेल्या मालाचे पैसे मागितल्याचा राग; मारहाण करणाऱ्या आरोपींना न्यायालयाकडून दंडाची शिक्षा

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील गौसपुरा परिसरातील रहिवासी अब्दुल कादर अब्दुल रज्जाक मणियार यांनी गांधी चौक पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या स्क्रॅप मार्केटमधील रहेमत स्टील दुकानातून आरोपी जावेद रमजान पठाण व रमजान शिलारखॉ पठाण यांनी पत्र्याच्या पेट्या तयार करण्यासाठी माल घेतला होता. दिनांक २६ फेब्रुवारी २०१५ रोजी फिर्यादी यांनी त्या मालाचे पैसे मागितले असता आरोपींनी पैसे देण्यास नकार देत शिवीगाळ, धक्काबुक्की केली. तसेच जावेद रमजान पठाण याने लोखंडी अँगलने फिर्यादीच्या डोक्यावर वार करून गंभीर दुखापत केली. या मारहाणीत फिर्यादीच्या डोक्याला गंभीर जखम होऊन ७ ते ८ टाके पडले होते.

या प्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ४७/२०१५ अन्वये भारतीय दंड संहितेच्या कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६, ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस अमलदार डी. जी. कांबळे यांनी पूर्ण करून पुराव्यानिशी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. खटल्यादरम्यान सरकारी पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्री. रामेश्वर ढेले यांनी प्रभावी युक्तिवाद केला. फिर्यादी, साक्षीदारांचे जबाब तसेच वैद्यकीय पुरावे यांच्या आधारे आरोपींकडून मारहाण झाल्याचे न्यायालयात सिद्ध झाले.

त्याअनुषंगाने मा. मुख्य न्यायदंडाधिकारी श्रीमती एम. एन. चव्हाण यांनी दिनांक ०६ जुलै २०२६ रोजी निकाल देत आरोपी जावेद रमजान पठाण, रा. इस्लामपुरा, लातूर यास भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४ अन्वये ५,००० दंड तसेच कलम ३२३ अन्वये १,००० दंडाची शिक्षा सुनावली. तसेच आरोपी रमजान शिलारखॉ पठाण, रा. इस्लामपुरा, लातूर यास कलम ३२३ अन्वये १,००० दंडाची शिक्षा सुनावण्यात आली. न्यायालयाने आकारण्यात आलेल्या दंडापैकी २,००० रक्कम फिर्यादीस नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश दिले आहेत.

सदर खटल्यात दोषसिद्धी होण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ट्रायल मॉनिटरिंग सेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. शिवशंकर मनाळे, गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. सुनील रेजितवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पैरवी अंमलदार मपोह सुमन कोरे यांनी प्रभावी पाठपुरावा करून खटल्याचे कामकाज यशस्वीपणे पार पाडले.

## लातूरच्या उड्डाणपुलाखाली घसरगुंडीमुळे धोका

**लातूर/(जिमाका):** लातूरच्या छत्रपती शिवाजी महाराज जवळील उड्डाणपुलाखाली रिपरिम पडणाऱ्या पावसामुळे घसरगुंडीचे स्वरुप आले असून धोका होण्याची शक्यता आहे. चिखलामुळे गाड्या घसरण्याची शक्यता आहे. येथे जमा होणाऱ्या पाण्याचा निचरा होत नाही. पाणी साचले जाते. त्यामुळे आपघात होण्याची भीती आहे.


महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

–:: लघु निविदा सूचना ::–

**निविदा क्र. १)EE/LTR/TS/T-13/2026-27 (रु.02.00 लाख).**

कार्यकारी अभियंता, महावितरण, लातूर विभागासाठी अधिकृत व नोंदणी असलेल्या ठेकेदाराकडून खालील कामासाठी निविदा मागविण्यात येत आहे.

**कामाचे स्वरूप :–**

**१) EE/LTR/TS/T-13/2026-27 –लातूर विभागांतर्गत ३३/११ kv उपकेंद्राची माहिती भरण्यासाठी DLR Book, Permit Book and Substation Register उपलब्ध करुन देणेबाबत.**

सदरील निविदा ई–टेंडरिंग पद्धतीची असून संगणकीय प्रणालीद्वारे भरावयाची आहे. महावितरण मध्ये नोंदणी असलेले ठेकेदार सदरील निविदा भरू शकतात. महावितरणच्या **https://etender.mahadiscom.in/eatApp/** या संकेतस्थळावर सदरील निविदा **दि. ०६.०७.२०२६** पासून उपलब्ध असेल. निविदा भरण्याची अंतिम तारीख **०९.०७.२०२६** असेल.

निम्नस्वाक्षरी करणाऱ्यास कोणतीही अथवा सर्व निविदा स्विकारण्याचे अथवा डावलण्याचे पूर्ण अधिकार असतील.

**पी.आर.ओ./ला.प./87/2026-27. DT.06.07.2026**

**कार्यकारी अभियंता, महावितरण लातूर विभाग**


## धडाड ..

इथेतिथे न् तिथे इथे
का झाडे पडे धडाड
दोष आहे पावसाचा
कशीचालवे कु–हाड
दोष म्हणे शासनाचा
जीभेला नाही रे हाड
संदर्भासह स्पष्टसांगे
करूनकात चिरफाड
दोषीकुठलेअधिकारी
बोलू नका फाड फाड
तोडतनाहीत फांदीही
झाडांचे करतात लाड
निर्दोषआहेत ठेकेदार
उडवूनका उगाचं राड
ओके रिपोर्टदेणारं मी
घरपोच पोचवे घबाड
कॅमेरे वटारतात डोळे
कशाचीचं नसते चाड
ब्रेकिंग न्यूज कडाडून
आघात करे धाडधाड
दोष आहे लोकांचाचं
झाडा खाली बि–हाड
वृक्ष प्रेमीही जिम्मेदार
तोंडू देत नाहीत झाड
दोष खरा झाडांचाही
पडणारचं रे धाडधाड
माणसांच्या देशा येता
अरे इथे राहतीगिधाड

**हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६

# डॉक्टर्स दिनानिमित्त श्री श्री रविशंकर विद्यामंदिर विद्यालयात १३० विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी

## एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व रुग्णालयाचा समाजोपयोगी उपक्रम






**लातूर/प्रतिनिधी :** लातूर, दि. ०४ :– डॉक्टर्स दिनानिमित्त एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व रुग्णालय, लातूर यांच्या वतीने श्री श्री रविशंकर विद्यामंदिर विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी मोफत दंत तपासणी व मौखिक आरोग्य जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात १३० विद्यार्थ्यांची दंत तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान विद्यार्थ्यांच्या दातांतील किड, हिरड्यांचे आजार तसेच इतर दंत समस्यांची तपासणी करून आवश्यक उपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. वरिष्ठ दंत चिकित्सक डॉ. सोमनाथ गित्ते, निवासी डॉ. अनुष्का पडवी व डॉ. निशिगंधा कांबळे यांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली. आंतरवासिता मेघा पाटील यांनी मौखिक स्वच्छतेचे महत्त्व, योग्य पद्धतीने दात घासण्याची पद्धत, संतुलित आहार आणि नियमित दंत तपासणीची गरज याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी आंतरवासिता गायत्री पांचाळ, सोफिया पटेल आणि तनुष्या पुनरकर यांनी सक्रिय सहभाग घेतला. शिबिराचे समन्वयन श्री ज्ञानोबा केंद्रे यांनी केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे यांनी डॉक्टर्स दिनाच्या शुभेच्छा देताना सांगितले की, बालवयापासून दंत आरोग्याच्या योग्य सवयी जोपासल्यास निरोगी समाज घडण्यास मोठी मदत होते. समाजाभिमुख आरोग्यसेवा आणि जनजागृतीसाठी एमआयडीएसआर दंत महाविद्यालय भविष्यातही अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करत राहील.

यावेळी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती प्रमिला राऊळ, शाखा समन्वयक श्रीमती सुष्मिता सगरे तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.


निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

टोनर रिफिलिंग

फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ड्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६